Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - VII JULY 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# *ख्रिस्ती व्यक्ती म्हणजे कोण ?*

## *(Who is a Christian?')*

**विश्वास गोरखनाथ वळवी,**
संशोधक विध्यार्थी सामाजिक शास्त्रे प्रशाळा,
इतिहास विभाग,कबचौउमवि,जळगाव

**साराश:-**

*एका ख्रिस्ती व्यक्तीला सर्वात जास्त गरज ख्रिस्ताची आहे पण कशी.जॉन मॅकआर्थर लिहितात एका ख्रिस्ती व्यक्तीला सर्वात जास्त गरज कशाची आहे. ''पवित्र-शास्त्र आपल्याला आवश्यक आहे.आम्हांला दृष्टांताची गरज नाहीआंम्हाला नवीन प्रकटीकरणाची गरज नाही.आम्हांला स्वर्गातून वाणी ऐकण्याची गरज नाहीजे शास्त्र उतारे आम्हांला देऊ केले आहेत ते परिपूर्णआहेत.काही उपदेशक स्वताला ख्रिस्ताचा जागी ठेवतात आणि म्हणतात आम्हाला कशाची गरज नाही.जे ओस्वल्ड सँडर्स लिहितात ''जो ख्रिस्ती पुढारी कधीच चुकत नाही असे म्हणतो,त्यावर लोकांचा विश्वास बसत नाही."जीवनातील एका क्षेत्रात आपण कधी चुकत नाही असे म्हणतो तेव्हा दुसऱ्याक्षेत्रा संबंधी तेच आपण लागू करत असतो ही वस्तुस्थिती आहे म्हणून स्टीव्हन लॉसन देवाकडे आस लावून सांगतात''आम्हाला असे उपदेशक दे:जे सत्य *जाणतात*,जे सत्य *जगतात*,जे सत्य *घोषीत करतात*,जे सत्य *लागू करतात*,आणि जे *सत्याचे रक्षण करतात*."हे देवा माझी झडती घेऊन माझे हृदय जाण, मला कासोटीस लावून माझे मनोभाव तपास. माझ्याठाई दृष्टपणाकडे काही प्रवृत्ती असेल तर पाहा आणि मला सनातन मार्गाने ने."कारण "माझे सर्व दिवस तुझ्या हाती आहेत"( स्रोत 31:15)त्यांना ते करू द्या. कारण मृत्युच्या वेळी आणि न्यायदंडाच्या दिवसात ते तुमची थट्टा करणार नाहीत. म्हणून तुमचा ध्वज उंच करा; तुमचा रंग दाखवा; त्यांना ध्वज खांबावर चढवादारू पिणे, जुगार खेळणे, खोटे बोलणे, शपथ घेणे, आळशीपणा, गर्व आणि प्रभुवारी मंडळीला(चर्च) न जाणे यांविषयी निश्चितच तुम्ही शर्मिंदा असला पाहिजे परंतु पवित्र-शास्त्र वाचणे, प्रार्थना करणे आणि ख्रिस्ताचे अनुयायी असणे याविषयी तुम्हाला बिल्कूल लाज वाटण्याचे कारण नाही याविषयी ज्यांना हसायचे - त्यांना हसू द्या कारण एक चांगला सैनिक त्याच्या देशाचा ध्वज आणि त्याच्या गणवेशाचा रंग याविषयी कधीही लज्जित होत नसतो. तसेच तुम्हीही तुमच्या धन्याची कधीही लाज धरू नये याची काळजी घ्या.कारण "नरकातील एक दिवस हा आयुष्यभर वधस्तंभ वाहण्यापेक्षाही अधिक वाईट आहे.''*

**प्रस्तावना:-**

*''ख्रिस्ताच्या मेंढराला ख्रिस्ताची वाणी*[वचन]खटकणार नाही''-चार्ल्स स्पर्जन-*

मी,मी म्हणून जगत नाही तर ख्रिस्त माझ्याठायी जगतो, त्याचे पवित्र वचन माझ्याठायी जगतअसते.खरा ख्रिस्ती व्यक्ती आणि उपदेशक कोण आहे?पौल खोट्या उपदेशक आणि सुवार्ता पासून सावधान राहण्यास आम्हाला सांगतोज्याला पवित्र आत्मा मार्गदर्शन करून शास्त्र शिकविते आणि ज्याने स्वताला ख्रिस्तासाठी रिक्त केलेले आह.जो देवाला शेवटपर्यंत आज्ञाधारक राहील तोच खरा ख्रिस्ती म्हणून देवासमोर मान्य होईल.क्लेपा आवळे यांची ही कविता ख्रिस्ताचा मुलांची व्यथा चांगल्या प्रकारे सांगते''आम्ही देवाची मुलं,आम्ही देवाची मुलं, म्हणतां म्हणती,गुलामाचा प्रतिसाद विसरत चाललोत,अन् सुवार्तेच मुळच गमावून बसलोत.वधस्तंभाने अतृप्ती झालेले आम्ही अन्य सुवार्तेलाच सुवार्ता म्हणून बसलोत.वधस्तंभाविषयी बेजबाबदारपणे बोलणे किती भयावह आहे हे कधी समजु शकलो नाही.कारण वधस्तंभाची सुवार्ताच आम्हाला माहीत नाही.गुलामाचा प्रतिसाद, देव कृपेनेच मिळालेले दत्तकपण हे ख्रिस्ती जीवनाचा अविभाज्य अंग आहे.पण हे समजण्यासाठी प्रौढत्वच अपेक्षीत आहे.आम्हाला सिद्धांताचे शिक्षण नको म्हणनारे प्रौढत्वात कसे चालतील.कारण वचनांनेच अतृप्ती होतेतर बालबुद्धीचे प्रौढ कसे होतील.''"जॉन आर डब्लू स्टोट* सांगतात जॉन क्रिसोस्टोम सुवर्ण मुखी उपदेशक म्हणूनओळखले जात होते,

त्यांच्या उपदेशाची चार वैशिष्टय नमूद करता येईल जी आजचा उपदेशकांना खूपच महत्वाची आहे1)ते पवित्र शास्त्रावरच बोलत:पवित्र शास्त्रातील बऱ्याच पुस्तकांच्या आधारावर ते योजनाबद्द उपदेश तर करीतच,परंतु त्यांच्या संदेशात पवित्र वचनांचे अनेक संदर्भ व उल्लेख असत आजचा उपदेशकाला व्यक्तिगत साक्ष मिसळल्याशिवाय संदेश देताच येत नाही.2)पवित्र वचनांचे स्पष्टीकरण:-पवित्र वचनांचे स्पष्टीकरण हे सुलभ व साध्या रीतीने ते करीत,आज काही पाळक पवित्र आत्म्याचा आवाजाव्यतिरिक्त स्वतःचा आवाज मंडळी जोर-जोराने सांगण्याचा प्रयत्न करतात.3)नैतिक आचरणाची व्याख्या योग्य करणे:-त्यांची नैतिक आचरणासंबंधी व्याख्या अगदी व्यावहारिक स्वरूपाची असे,आज जर त्यांचे संदेश वाचू लागलो तर चवथा शतकाच्या अखेरीस राजवैभव,धनवंतांचा चैनीची व ख्यालीखुशालिची साधने,भव्य शर्यती व क्रीडा,एकूण पौवार्त् देशामधील सर्व विलासजीवनाचे चित्र समोर उभे राहते,खरंच काळ गेला पण मंडळीने भौतिक आकर्षण आपल्या मंडळीतून दूर केलेले दिसत नाही.४)दोष दाखिविण्याबाबत निर्भीड:-असे म्हणता येते की ते व्यासपीठाचे रक्तसाक्षी झाले,कारण त्याचे निर्भीड पण निष्ठावान संदेश,त्यांच्या हद्दपारीस कारण झाले,आज जर एकाद्या पाळकाला त्याचे दोष दाखविले तर सर्व पारडे त्याचे फुटायला लागतात,माझ्या सारखा महान सेवक पूरी पृथ्वीवर कुठेच नाही असे चित्र उभ्या करणाऱ्या पाळकांनी जॉन क्रिसस्टोम पासून संदेश कसा द्यावा आणि चारित्र कसे असावे नक्कीच शिकण्यासारखे आहे.

*ख्रिस्ती व्यक्ती म्हणजे कोण?*
*ख्रिस्ती व्यक्ती म्हणजे कुठला व्यक्ती:*
*ख्रिस्ती व्यक्ती म्हणजे कोणाचे प्रतिबिंब?*
*ख्रिस्ती व्यक्ती म्हणजे कोणाचा प्रतिनिधी?*
*ख्रिस्ती व्यक्ती म्हणजे कोणाची कृती?*
*उत्तर आहे."स्वर्गाचा व्यक्ती,*
*उत्तर आहे देवाचे प्रति स्वरूप,*
*उत्तर आहे देवाच्या राज्याच्या प्रतिनिधी,*
*उत्तर आहे देवाच्या ध्येयाची कृती,*
*उत्तर आहे मी संपूर्ण ख्रिस्तात आहे आणि चालतो*

**१) खरा विश्वासी अनंतकाळासाठी तारला जातो:-**

*नाथन एडवर्ड* लिहितो''देव हा सर्वश्रेष्ठ आहे.देव हा मानव प्राण्याकरिता सर्वश्रेष्ठ आहे.त्याचा आनंद घेणे हाच केवळ आणि योग्य आनंद होय; ज्याद्वारे आपला आत्मा तृप्त होऊ शकतो.स्वर्गात जाणे आणि देवाचा पूर्ण आनंद घेणे हे या जगातील कोणत्याही राहण्याच्या ठिकाणापेक्षा सर्वात्तम आहे. पिता, आई, पती व पत्नी किंवा मूले, किंवा कोणाचीही संगती, किंवा भूतलावरील सर्व मित्रांपेक्षाहि ते उत्तम आहे या सर्व छाया आहेत; पण देवाचा आनंद हा मात्र सार आहे. हि सर्व विखुरलेली किरणं आहेत, पण देव सुर्य आहे. हे सर्व झरे आहेत; पण देव हा उगम आहे. हि सर्व थेंबे आहेत पण देव हा सागर आहे." जो व्यक्ती देवावर विश्वास ठेवतो त्याची कधी फजिती होत नाही.आणि तो अनंतकाळासाठी तारला जातो.*विलियम मैक्डोनाल्ड'* लिहितो "सन्मार्गापासून बहकणारे पण काही जण असतात, अशाचा पालट झाला तरी कालांतराने ते मोहापायी प्रभू पासून दुरावतात,पेत्राचे उदारहरण पाहा त्याने ख्रिस्तावर खरी प्रिती केली पण तो ही बहकला,अशाना देव एक तर शिस्त लावून जीवनात पुन्हा संधी देतो किंवा येथून वर नेतो.''

'त्याचप्रमाणे पतित धर्मभ्रष्टाचाही एक प्रकार असतो.पवित्रशास्त्रातील उदारहरण घ्यायचे झाले तर यहूदा इस्कयोर्त आजच्या काळात असे अनेक जण सापडतात ते विश्वासात असल्याचे ढोंग करतात पण त्यांचा नवीन जन्म झालेला नसतो,काहीजण ता सर्रास बाप्तिस्मा घेऊन स्थानिक मंडळींचे सदस्यत्व व इतर महत्वाची पदे भूषवितात,पण हे ख्रिस्तद्वेषटे व ख्रिस्ती सत्याला न जुमानणारे असतात, अशांमध्ये बदल घडणे महाकठीण असते.'या सर्व बाबीमध्ये आपण आपले धर्माचे तत्व व शिकवण अनुभव किंवा भावनेआधारे मांडणे योग्य नाही,कसोटी हीच,'पवित्रशास्त्र काय सांगते?पवित्र शास्त्र हेच सांगते की खरा विश्वासणारा अनंतकाळासाठी तरला जातो,हैं म्हणजे अगदीच सोपे!तारण म्हणजे विनामूल्य मिळणारी देणगी असा समज घेणे रास्त नाही,आपले शुभवर्तमान अतिशय अल्पमोलाचे आहे असे तुम्हाला वाटत आहे काय?'म्हणून काही अभक्तिने वागणारी माणसे आपल्या देवाचा कृपेचा विपयार्स करून तिला

कामातुरपणाचे स्वरूप आणतात,आणि आपला एकच स्वामी व प्रभू येशू ख्रिस्त ह्याला नाकारतात"

**२) देवावरील आस सोडणे पाप आहे:-**

*सी.एच.मैकिन्टोश* म्हणतात '."प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष माझ्या गरजा मानवांना माहित करून देने,हे विश्वासाच्या जीवनापासून वेगळे होने आणि देवाचा उघड अपमान करणे आहे,ते खरोखरंच त्याचा विश्वासघात केल्यासारखे आहे,देवाने मला अपयश दिले आहे आणि मी माझ्या सोबत्याकडे मदतीसाठी पाहिले पाहिजे असे म्हणण्यासारखे ते आहे.जिवंत झरा धिक्कारून मोडक्या हौदाकडे वळण्यासारखे ते आहे,माझ्या आत्मा व देव यांच्यामध्ये मानवप्राण्याला स्थान देऊन अमोल आशिर्वादापासून माझ्या आत्म्याची आणि देवाला क्रमप्राप्त असलेल्या गौरवापासून त्यांची वंचना करण्यासमान ते आहे"

चार्ल्स स्पर्जन एका ख्रिस्ती व्यक्तिची सर्वात स्वस्थ स्थिती काय असते याच्यावर भाष्य करतांना लिहितात "मी तर दीन व दरिद्री आहे. हे देवा, माझ्याकडे येण्याची त्वरा कर; माझा साहाय्यकर्ता व माझा मुक्तिदाता तू आहेस; हे परमेश्वरा, विलंब लावू नकोस" (स्तोत्र ७०:५)प्रार्थनेची कृती आपल्याला आपल्या अयोग्यपणाची शिकवण देते - जी आपल्यासारख्या गर्विष्ठ प्राण्यांसाठी एक अतिशय उपयुक्त धडा आहे जर देवाने आपल्याला त्यांच्यासाठी प्रार्थना करण्यास बाध्य न करता आशीर्वाद दिले तर आपण किती दिन आहोत हे आपल्याला कधीच कळणार नाही. पण एक खरी प्रार्थना...आमच्या गरजांची यादी, आमच्या आवश्यकतांची एक सूचीआमच्या लपलेल्या दारिद्र्याचे प्रकटीकरण आहे. प्रार्थना ही दैवी संपत्तीचा एक अर्ज आहे.पण मानवी रिक्तपणाची ही एक कबुलीजबाब देखील आहे. एका ख्रिस्ती व्यक्तिची सर्वात स्वस्थ स्थिती असते,ती.नेहमीच स्वत:मध्ये रिक्त असणे, पुरवठा होण्यासाठी सतत प्रभुवर अवलंबून राहणे,नेहमीच स्वत:मध्ये दिन असणे आणि येशूमध्ये धनवान राहणे; स्वत: पाण्यासारखे दुर्बळ असल्यासारखे – परंतु देवाकडून मोठा पराक्रम होण्यासाठी सामर्थ्यवान. आणि म्हणूनच प्रार्थना, जेव्हा देवाला आवडते, तेव्हा ती मनुष्य प्राण्याला जिथे असयला पाहिजे तेथे आणते - अगदी धूळी मध्ये!

प्रार्थना हि स्वत:मध्ये तीच्या उत्तराखेरीज ख्रिस्ती व्यक्तीसाठी मोठ्या फायद्याची आहे. जसा धावपटू दैनंदिन व्यायामाने शर्यत धावण्यासाठी ताकद वाढवतो; तसेच जीवनाच्या महान शर्यतीसाठी, आपण प्रार्थनेचे पवित्र परिश्रम करून बळ मिळवतो. प्रार्थनेद्वारे देवाच्या तरूण गरुडाला पंख फुटतात – यासाठी की ते ढगांवर उडू शकतील. प्रार्थना, लढण्यासाठी पुढे देवाचा योद्धा पाठवते – ज्याच्या पेशी बळकट आणि स्नायू भक्कम आहेत. जसा पूर्वेकडून सूर्य उगवतो तसा एकाग्रतेने विनंती करणारा व्यक्ती त्याच्या खोलीतून बाहेर येत असतो– अशाप्रकारे जसा एक बलवान मनुष्य त्याची शर्यत धावला आहे.प्रार्थना हि त्या मोशेच्या उंच केल्याला हाताप्रमाणे आहे – जीने अमालेकी लोकांची दाणादाण यहोशवाच्या तलवारीपेक्षा अधिक केली. प्रार्थना...मानवी दुर्बलतेला दैवी सामर्थ्याने घेरतेमानवी मूर्खता स्वर्गीय ज्ञानामध्ये बदलते.त्रासलेल्या मर्त्य प्राण्याला दैवी शांती देते.प्रार्थना काय करू शकते याची कल्पना आपण करु शकत नाही!हे महान देवा, तुझ्या द्याळूपणाबद्दल आम्ही तुझे आभार मानितो – ती तुझ्या आश्चर्यकारक प्रेमळ-दयाळूपणाची एक निवड पुरावा आहे. आज संपूर्ण दिवसांत ती योग्यपणे वापरण्यास आम्हाला मदत कर."

**३) विश्वास हा ख्रिस्ती जीवनाचा गाभा आहे:-**

विश्वासाची वास्तविकता म्हणजे "विश्वास हा ख्रिस्ती सत्याचा गाभा आहे;ते देवाच्या वचनाचे सारआहे.तो पवित्र जनांच्या एकदाच *स्वाधीन* केलेला आहे,आपण सर्वांनी ज्याकरिता लढावे असे विश्वास हे सर्वोच वास्तव आहे." विश्वासाने सुधारणा चळवळीत आपले मोलाचे योगदान देणारे मार्टिन ल्यूथर म्हणतात "सुधारणूक चळवळीच्या सुरूवातीपासून मी देवाला स्वप्न, दृष्टांत, किंवा देवदूत पाठविण्यास सांगितले नाही,तर त्याचे वचन जे पवित्र-शास्त्र त्याविषयी योग्य समज देण्यास सांगितले, कारण मी जाणतो की, जोपर्यंत देवाचे वचन माझ्याकडे आहे,तोपर्यंत मी त्याच्या मार्गात चालत आहे आणि मी कोणतीही चूक किंवा भ्रमात पडणार नाही." लुथरने विश्वासाने प्रत्येक मनुष्य जगेल असे ब्रीदवाक्य जाहीर केले.विश्वास हा धर्मसुधारणा चळवळीचा मुख्य गाभा होता.

४) **ख्रिस्ती तरुणांनी स्वत:ला सुवार्तेसाठी तयार केले पाहिजे:-**

*जेफरसन लिहितो* "तरुण मनुष्यासाठी मेंढपाळ होने हे सोपे काम नाही'' तसेच *ब्रायन बीडबाक* म्हणतात "कोणताही पाळक अथवा विश्वासी परिपूर्ण नाही''.पण तो प्रयत्नशील आहे कोणीही पाळक परिपूर्ण नाही आणि जर एखादी मंडळी अशा पाळकांचा शोध घेत असेल तर तिला तसा पाळक शोधूनही सापडणार नाही.तसेच तुमच्या मंडळींसाठी योग्य विश्वासी शोधणे कधीच सोपे नसते;पण परिपूर्ण विश्वासी शोधणे अशक्यच असते." म्हणून जर एका दिवसांत किंवा एका वर्षात तो जर मेंढपाळ बनू शकला नाही तर त्याने निराश होण्याचे कारण नाही ऐखादा वक्ता विनासायास बनू शकतो,सुधारक चुटकीसरशी बनू शकतो,राजकारण आणि समाज याची टीका करत पहिल्याच रविवारी त्याच्या व्यवसायाची भरभराट होऊ शकते, पण मेंढपाळ मात्र संथ गतीने आणि धीराने वधस्तंभाचा मार्ग चालतच बनू शकतो.देवाचा पाळक हा नेहमी पवित्र शास्त्रात आणि ख्रिस्ताचा वधस्तंभ सावकाश घेऊनचं उत्तम मेंढपाळ बनू शकतो,या तरुण पाळकाने एक दिवस अथवा एक महिन्यात पाळक होण्याचा प्रयत्न केला तर तो कधीही स्वतःचा क्रूस उचलू शकत नाही. ख्रिस्ताने स्वत:18 वर्ष देवाचा वचनात आणि अनुग्रहात घालविली,मोशेला देवाने चाळीस वर्ष मेंढरे चारून नम्र केले.योहान बाप्टिस्टदाता वीस वर्ष जंगलात राहिला,पाऊल तीन वर्ष अरबस्थान येथे राहून देवाचा वचनात आणि अनुग्रहात वाढला,अजून किती तरी देवाचे लोक या प्रकारे तयार होऊन त्यांनी सेवेचा नरशिंग फुंकला,पण आज मंडळीत पाळक नेमन्याची प्रथा बघून दुःख होते.प्रश्न काय आपण क्रूस उचलून पाळक अथवा विश्वासी बनलात? की आदी पाळक विश्वास बनून क्रूस उचलला?.

५) **तुम्ही ख्रिस्तात परिवर्तीत आहा का शरीरात:-**

"जीवनाचा या खेळात अखेर विजय होणार तो ख्रिस्ताचा आणि ख्रिस्ती लोकांचाच;हे अटळ आहे.पण "अंत:करणात शुद्ध ते धन्य आहेत.कारण ते देवाला पाहतील."(मत्तय -5:8)"तुमचे स्वभाव परिवर्तन की धर्मपरिवर्तन"याचं वचनाने रेव्ह नारायण वामन टिळक यांचे परिवर्तन झालें,त्यांच्यावर जेव्हा हिंदू धर्माकडून टीका झाली तेव्हा त्यांनी सांगितले हे धर्मपरिवर्तन नाही तर स्वभावपरिवर्तन आहे.आज अनेक पाळक आणि ख्रिस्ती लोकांचा फक्त समाजापुढे धर्मपरिवर्तन झालेले आहे स्वभाव परिवर्तन नाही,म्हणून आज रेव्ह ना वा टिळक यांचा उदाहरण घेऊन आपण देखील आपल्या स्वभावाला शुद्ध करूया की मृत्यूला सामोरे जातांना आपण ख्रिस्ताला पाहू.पंडिता रमाबाई यांचे शब्द ख्रिस्ती व्यक्ती म्हणजे कोण यांचे उत्तर देतात.

*"त्यावेळी मला समजून आले की मला केवळ ख्रिस्ती धर्माचीच नव्हे तर *ख्रिस्ताची गरज आहे,*
*माझ्यासाठी ते अगत्याचे होते...*
*मी काय करू शकत होते?*
**माझे विचारही मला मदत करू शकले नाहीत आणि करूही शकले नसते..,*
*मी स्वत:च्या शेवटास आले, आणि विनाअट *तारणाऱ्याला अधीन व शरण गेले...,*
*"माझ्यावर दया कर, माझ्या पापला दूर करून, माझे तारण व माझी नीतिमत्ता तू बन,अशी मी ख्रिस्ताला प्रार्थना केली"*

६) **एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून मी ख्रीस्तासाठी काय केले पाहिजे:-**

*जेम्स स्मिथ* ख्रिस्ताने आपल्यासाठी काय केले याची आठवण करून देतात.आणि आपण ख्रीस्तासाठी काय करायला हवे याचे उत्तर देतांना म्हणतात ''त्याने तुम्हांला काय सांगितले ह्याची आठवण करा!"(लूक २४:६)हा संदेश देवदूतांनी पुनरुत्थानाच्यादिवशी त्या कबरे जवळ असलेल्या स्त्रियांना सांगितला जो आज आपल्यासाठी सर्वात जास्त लागू आहे.कारण त्याचे (येशूचे) वचन आपण तत्काळ विसरत असतो.येशूचे शब्द (वचने) आपल्या स्मरणात सर्वोत्तम ठिकाणी ठेवली पाहिजे:

१. त्यांच्या अंतर्भूत मूल्यामुळे येशूच्या शब्दासारखे असे कोणतेही शब्द नाहीत, जे स्वभाव व इच्छेला, आणि देवाच्या अभिवचनांना प्रकट करते.

२. त्यांच्या सत्यतेमुळे ती सर्व सत्य – ती स्वतः सत्य आहेत.

३. त्यांच्या योग्यतेमूळे ते...

पापाला थांबविते,
भयाला नियंत्रित करते,
आत्मविश्वास निर्माण करते,

आभार सह प्रेरणा देते,
आणि प्रीतीने आपणाला भरते.

४. त्यांच्या उपयुक्तेमूळे...
आपल्या दैनदीन परीक्षेमध्ये,
आपले मार्ग निर्देशित करण्यासाठी,
आपल्या अपेक्षांवर राज्य करण्यासाठी,
आपल्या अंतःकरणास सांत्वन देण्यासाठी,
आपल्या विश्वासाचे पोषण करण्यासाठी आणि आधार देण्यासाठी,

आजारपणाच्या शय्येवर आणि आणि मृत्यूच्या वेळी ते उपयूक्त आहेत.

तर चला मग, येशूच्या शब्दांना (वचनांना) लक्षपूर्वक, परिश्रमपूर्वक आणि अधिक प्रार्थनेद्वारे आपल्या अंतकरणात खजिना म्हणून साठवूया

आपल्या स्मृतीत ख्रिस्ताची शब्द (वचने) साठवली जातात का?

आपण त्यांच्यावर मनन करतो का?

आपण त्यांच्याद्वारे चालतो का?

“ज्याची माझ्यावर प्रीती असेल तो माझे वचन पाळील...” (योहान १४:२३)

**७) ख्रीस्तासाठी भोगलेली दुखेदेवाचा गौरवासमोर शून्य आहे:-**

*“आकाश व पृथ्वी नाहीशी होतील; परंतु माझी वचने मुळीच नाहीशी होणार नाहीत.”(लूक २१:२३)*

ए. डब्ल्यू. पिंक लिहितात ‘’जेव्हा एका सेकंदाच्या गौरवाचे वजन जीवनभराच्या दुःखांवर पडेल तेव्हा ते भारी भरेल. म्हणून आयुष्यभर सोसलेली कष्ट आजार, गरिबीशी केलेला झगडा, दुःख मग ती कोणत्याही किंवा हरएक प्रकाराची असली तरीही जेव्हा त्यांची तुलना इम्मानुएलाच्या वैभवी भूमीशी केली जाते तेव्हा ती काय असू शकतील?कारण परमेश्वराच्या उजव्या हातात असलेल्या सुखाच्या नदीचा एक घोट, सुखलोकात घेतलेला एक श्वास, राजासनाच्या चारही बाजूने रक्ताने धुतलेल्या समुदायाबरोबरील एक तास, पृथ्वीवर सांडलेले सर्व अश्रू व केलेला विलाप यांच्या भरपाई पेक्षा अधीक असेल. "कारण आपल्यासाठी जे गौरव प्रकट होणार आहे त्याच्यापुढे सांप्रत काळाची दुःखे काहीच नाहीत असे मी मानतो.पवित्र आत्मा लेखक व वाचक या दोन्ही ना हे सत्य योग्य विश्वासाच्याद्वारे जतन करण्यास, आणि वर्तमान स्थितीत असणारी संपत्ती आणि आंनद ,यांच्याद्वारे देवाच्या कृपेच्या गौरवाची स्तुती होण्याकरिता साह्य करो.

**८) ख्रिस्ताला संतुष्ट करणारे उन्नत पावले-**

*’आपण स्वतःचे मापन आपल्या स्वामीद्वारे करूया,आणि आपल्या सहकारी-सेवकांद्वारे नाही.असे केल्याने गर्व येणे अशक्य होईल.’’ चार्ल्स स्पर्जन*

*'डॉ एम आर डीहान'* एकदा म्हणाले "ख्रिस्ताकडे येण्यासाठी कवडीही खर्चावी लागत नाही,ख्रिस्ताला अनुसरायचे तर थोडी किमंत मोजावी लागते,पण ख्रिस्ताची सेवा करायची तर सर्वस्व वेचावे लागते."प्रभूसाठी तुम्ही किंमत देत असाल तर जास्त दिंडोरा नका वाजवू,देवाचा अपमान होईल,कारण तुम्ही एकटेच नाही?’’जो खऱ्या अर्थाने ख्रिस्ताला अनुसरतो त्यांची कवडीही प्रभू खर्चू देत नाही,खर्चली तरी देव कोणाचे कर्ज ठेवत नाही.मग का आज काही मंडळीत पैशाशिवाय सेवा करणे म्हणजे अशक्यच असे वातावरण आहे.आज खूप ख्रिस्ती लोक दिंडोरा पिटतात मीने देवासाठी एवढे किमंत मोजली आहे,असा लोकांनी ख्रिस्ताला पाहावे तो देव असून जसा बळीकरायला कोकरा शांत उभा राहतो तसा तो उभा राहिला आणि मृत्यु सहन केली. पेत्र मी या योग्यतेचा नाही की क्रुसावर उभे मरावे माझा प्रभूचा अपमान होईल,मला उलटे क्रुसित करा.स्मृणा चे बिशप पॉलीकार्प याना स्वतःला खांबाला बांधायला मना केली मी मी माझ्या प्रभू साठी अग्नी सहन करेल मी हलणार देखील नाही,अंतिमतः अग्नी देखील पॉलीकार्पला चटके देऊ शकली नाही,त्याच्या ह्रदयाला तलवारीने आर पार केले आणि तो रक्तसाक्षी झाला."_

इतिहासामध्ये अशी अनेक उदाहरणे आहे त्यात मार्टिन लुथर,जॉन नॉक्स, सेंट अगस्तीन,येशूचे सुरुवातीचे अकरा प्रेषित,आधुनिक मिशनरी,ज्यांनी स्वतः देवासाठी मृत्यु पत्करली पण कधी किंमत मोजण्याचा दिंडोरा पिटला नाही.डॉ एमिल जेबासींग अन्नन बरोबर म्हणतात ‘’कांही जण माणसांना संतुष्ट करणारे होते ते मुर्ख ठरले,ज्यांनी येशूला संतुष्ट केले ते उन्नत पावले’’

**९) स्वताला उंच करणारे उधोगातीच्या मार्गावर असतात:-**

तारणापेक्षा मोठ्या क्षणिक आणि तात्पुरत्या आशीर्वादांची घोषणा करणारे प्रचारक मला आश्चर्यचकित करतात.

ते म्हणतात.तारणानंतर तुम्हाला मोठ्या व गूढ गोष्टी प्राप्त होतील." त्या म्हणजे आरोग्य, संपत्ती, यश आणि समृद्धी. त्यामुळे तारण केवळ एक छोटी व लहान घटना आहे.ज्याद्वारे तुम्ही मोठ्या आशीर्वादाकडे वाटचाल करतात.

ह्यामुळे देवाच्या तारणाच्या कार्यात आम्ही तृप्त नाही आणि त्यात देवाचे गौरव देखील आम्हाला दिसत नाही. परिणामी आम्हाला सुवार्तेमध्ये अन्य जोडावे लागते.ते अन्य असे दिसते.तुम्ही दैवी आहात, छोटे ख्रिस्त आहात,तुमच्या शब्दात सामर्थ्य आहे व तुम्ही त्याने स्वतःचे भविष्य घडविणार, मोठ्या व गूढ गोष्टींसाठी देवाने तुमची निवड केली आहे,देव तुम्हाला गहन गोष्टींचे वारस करत आहे,असे कबूल करा- हि घोषणा करा,तुमचे दैवी आशीर्वाद ह्या महिन्यात तुम्हाला प्राप्त होणार,तुम्ही रोग-मुक्त, कर्ज-मुक्त होणार.वरील गोष्टींचा स्पष्ट उल्लेख पवित्र शास्त्रात दिलेल्या सुवार्तेत आम्हाला दिसत नाही तरी देखील आम्ही हे मान्य करतो. कारण हे आमच्या स्व: ला स्थान देते.तारण देवापासून त्याच्या निवडलेल्या लोकांसाठी आहे ह्याची अनेक वचने असतील तरी आम्ही ते मान्य करणार नाही. पण आशीर्वादासाठी देवाने तुम्हाला निवडले असे अस्पष्ट संदर्भांबाहेरील वचन आम्ही गटकण गिळून टाकतो. ह्यावरून हेच सिद्ध होते कि, आज सुवार्ता हि मनुष्य केंद्रित आहे. तोच प्रचारक उत्तम जो उत्तम रित्या तुमच्या स्व: ला खाद्य पूरवेल.

*अर्पण बागची म्हणतात* ''आज ख्रिस्ताच्या मंडळीला असे सेवक हवे आहेत जे पवित्रशास्त्रात जास्त आणि पुलपीटवर कमी वेळ घालवतात. त्यांना देवाचा सेवक बनायला अवघड जात आहे कारण ते जगाचे सेवक झालेत. (त्यांचा रस ख्रिस्तात प्रौढ बनुन नव्हे तर ख्रिस्तात बाळ म्हणून राहण्यात जास्त आहे) ह्याचा परिणाम काय तर मंडळीत मेंढरपेक्षा शेळ्या जास्त. कारण मंडळीच्या संदेशवाहकाला कोणत्या गोष्टीविषयी उपदेश करणे आवश्यक आहे याविषयी जाणिवच नाही. त्यांच्या चर्चमध्ये(ख्रिस्ताच्या नव्हे) उपस्थित असणाऱ्यांची संख्या भरपूर असू शकते परंतु मंडळीत मृत माणसांची हाडे व सर्वप्रकारचा भ्रष्टाचार सापडेल.याचा सर्व दोष संदेशवाहकांच्या माथी असेल(यिर्मया २३:१-४) सेवकाचे काम म्हणजे ख्रिस्ताला गमावलेल्यांना पापाची जाणीव करुन त्याच्या मार्गात चलावणे आणि *मेंढरांचे मनोरंजन न करता, त्यांचे (मेंढरांचे) पालनपोषण करणे होय.

"जर कोणी अन्य तऱ्हेचे शिक्षण देतो आणि आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची जी सुवचने ती, व सुभक्त्यनुसार जे शिक्षण ते, मान्य करत नाही, तर तो गर्वाने फुगलेला आहे; त्याला काही कळत नाही, तो वादविवाद व शब्दयुद्ध ह्यांमुळे वेडा बनला आहे; ह्यांपासून हेवा, कलह, अपशब्द, दुसऱ्याविषयीचे दुष्ट संशय उत्पन्न होतात; मन बिघडलेल्या, सत्यास मुकलेल्या, भक्ती हे कमाईचे साधन आहे अशी कल्पना करणाऱ्या माणसांची एकसारखी भांडणे होतात; [त्यांच्यापासून दूर राहा] चित्तसमाधानासह भक्ती हा तर मोठाच लाभ आहे."

(१ तीमथ्याला ६:३-६)''आत्मपरीक्षणाशिवाय पर्याय नाही मित्रांनो.''

**१०) पाळक मानवतेची सेवा करण्याची ख्रिस्ताची प्रतिकृती आहे:-**

*''उपदेशकाचा जीवनातून सत्य दिसले,तरच त्याचे उपदेश सामर्थ्यवान बनतात ."*

विलियम मैक्डोनाल्ड "देवाचा पाळक अथवा एखादी ख्रिस्ती व्यक्ती;जर आपले व्यक्तिगत कामे नेहमी मंडळींचा विश्वासीयांकडून करवून घेतअसेल तर तो पाय धुवणारा सेवक नाही;तर तो उपभोग घेणारा विश्वासघातकी मित्र यहूदा इस्कारियोत* असतो.देवाचा पुत्र हाच परिपूर्ण सेवक आहेत्याने स्वतः कमरेला रुमाल गुंडाळला तो लोकांचा सेवक झाला हे आपण लक्षात घेतले तर शुभवर्तमान अधिक सोंदर्याने चमकू लागेल.देवाच्या पुत्राचा अवतार असा जगात एक मनुष्य जगतो,त्याने पित्याची आज्ञा पाळून त्याच्या इच्छेप्रमाणे सर्व केले आणि त्याने केलेली सर्व महान कृत्ये पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने केली''

वरील उतारा वाचल्यावर आजच्या काही पाळक आणि येशू यांची तुलना अशक्य आहे.येशू मनुष्य झाला,आज कोणता पाळक मनुष्य आहे?सर्वे देवच दिसतात,येशूने रुमाल

कमरेला गुंडाळला,आज भौतिकतेचा रुमाल सर्वीकडे गुंडाळलेला दिसतो,देवाचा वचनावर विश्वास नाही तर दोन दिवसांनी ख्रिसमस ला पाहून घ्या.प्रार्थना केली, वचन दिले,सुवार्ता सांगितली म्हणजे देवाची इच्छाच असते हे कुठेही लिहिलेले नाही,पहिले देवाची इच्छा मग प्रार्थना,स्तुती, वचन,सुवार्ता,आज पाळकाने सांगून दिले म्हणजे झाले; देवाची इच्छा असो- वा नसो, *देवापेक्षा आणि त्याचा इच्छेपेक्षा कोणतीही गोष्ट श्रेष्ठ अथवा मोठी नाही.सांगायचे एवढेच की फक्त येशूचं देवाचा मनुष्यप्रती परिपूर्ण सेवक होता,आजचा पाळक फक्त ख्रिस्ताची प्रतिकृती आहे,म्हणून आत्मिक माता-पिता आणि परिपूर्ण सेवक असण्याचा भास आजचा काही पाळकांनी बंद केला पाहिजे,आणि देवाचा कृपेवर स्वतः आणि मंडळींचा विश्वासी लोकांना भरोसा टाकण्यावर संपूर्ण भर दिला पाहिजे तेव्हा ख्रिस्ताची खरी शुभवार्ता अधिक सोंदर्याने लोकांनसमोर चमकेल.

*जॉर्ज व्हिटफिल्ड* यांचे शब्द मला प्रेरणा देवो "मी अशी प्रार्थना करतो की, माझ्या *स्वतःच्या नजरेत मी अती तुच्छ व्हावे आणि माझ्या प्रेमळ प्रभूच्या गौरवाचा कोणताही भाग चोरू नये."

**११)सैतान त्याच्या दारुगोळा नामधारी ख्रिस्ती लोकासाठी वापरत नाही**:-

एक प्रश्न आहे.माझ्या प्रभूसाठी कार्य करिताना मला छळाचा अनुभव येतो का? नामधारी ख्रिस्ती जगाचा नशेत असतो:आणि खरा ख्रिस्ती छळाचा छायेत असतो. "आपल्याला काही कमवायचे असले तर लोक आपल्याला चेतना देतात.पण ख्रिस्तासाठी आपण आवेशी असलो म्हणजे लोक आपली चेष्ठा करितात." म्हणून ख्रिस्ती व्यक्तीचे जीवनचरित्र हे क्षमाशील आणि प्रेममय असले पाहिजे.*सि. जे. महणे* म्हणतात "जेव्हां मी इतरांप्रती कटूत्वपणाची भावना ठेवतो किंवा त्यांना क्षमा करीत नाही,तेव्हां मी असे गृहीत धरीत असतो कि,देवाविरुद्ध त्यांनी केलेली पापे हि माझ्या पापांपेक्षा अधिक गंभीर अशी आहेत.परंतु याविषयी वधस्तंभ माझा दृष्टिकोन बदलवितो.आणि मला वधस्तंभाच्या द्वारे असे कळते कि,इतरांनी माझ्या विरुद्ध केलेली पापे हि इतकी गंभीर नाहीत, जेवढी मी देवाविरुद्ध केलेली अगणित पापे हि गंभीर आहेत.जेव्हां खऱ्या अर्थाने आपणास कळते कि,देवानेआपल्या कित्येक अशा अपराधांची क्षमा केली आहे,तेव्हां आपल्याला इतरांना क्षमा करण्यास कठीण जाणार नाही.'' खरे पाहता ''येशू राज्य स्थापन करणार यावर सर्व ख्रिस्ती लोकांचा विश्वास आहे;पण ख्रिस्ताने जे दु:ख भोगले,त्याकडे मात्र कोणाचे ही लक्ष जात नाही."

**१२) पवित्र आत्म्याने भरलेला ख्रिस्ती व्यक्ती कोण?**

*"प्रत्येक विश्वासाची कृती देवाच्या अभिवचनावर आधारित हवी"*

पवित्र आत्म्याने भरणे म्हणजे पूर्णपणे पवित्र आत्म्याच्या स्वाधीन होणे;आणि देवाच्या प्रत्येक वचनाचे आज्ञापालन करणे होय;जी व्यक्ती आत्म्याने भरलेली असते तिने सर्व पाप सोडलेले असते आणि तिच्यामध्ये फक्त देवाचे वचन असते.

मला आश्चर्य वाटते जेव्हा कोणी पवित्र आत्म्याने भरपूर असते पण वचनाचा ज्ञानाने कमजोर,हे कसे शक्य आहे,कारण देवाचा आत्मा सात गुणांनी पूर्ण आहे म्हणजे तो देवात पूर्ण आहे,1) परमेश्वराचा आत्मा. 2) सुज्ञानाचा आत्मा. 3) समजपणाचा आत्मा.4) सुसंकल्पाचा आत्मा 5) सामर्थ्याचा आत्मा.6) ज्ञानाचा आत्मा.7) भयाचा आत्मा._

पवित्र आत्म्याने भरलेली व्यक्ती आपल्या जीवनाचा प्रत्येक क्षेत्रात निट आणि व्यवस्थित असते,आणि त्यांच्यात पवित्र आत्म्याचे वरील सात गुण जीवनाचा प्रत्येक क्षेत्रात दिसतात.

1) देवाचे लोक त्याला ओळखतात कारण त्यांच्यात देवाचा आत्मा वास करीत असतो.
2) तो त्याचे ज्ञान शास्त्राचा द्वारे मांडण्याचा प्रयत्न करेल.प्रत्येक प्रश्नाचे उत्तर पवित्र वचनाने देणार,फक्त आत्म्यात नाचणार नाही.
3) देवाची व्यक्ती खऱ्या अर्थाने विचलित परिस्थितीत समजुतदारपणा दाखवित असते.
४) शुन्य ध्येयाने देवाची व्यक्ती कधीच कार्य करीत नसते,पवित्र आत्म्याच्या आवाज ऐकून पवित्र शास्त्राचा पुष्टीद्वारे ती संकल्प करून विश्वासाने कार्य करित असते.

5) देवाचे राज्य बोलण्यात नाही तर सामर्थ्यात आहे.शुद्ध चारित्र देवाचा सामर्थ्याने निर्माण होतं असते,चारित्र्याने सामर्थ्य

उत्पन्न होतं नसते.

6) बलाने नव्हें तर माझ्या आत्म्याने कार्यसिद्धी होईल.आत्मा हा ज्ञानाचा स्रोत आहे म्हणून ज्ञानाला तुच्छ जाणू नका देवाचा खरा व्यक्ती पवित्र शास्त्राचा ज्ञानाने भरलेला असतो,अज्ञानाने नाही.

7) काळातचा ओघात पाप करण्याचे भयं पूर्णपणे नाहीसे झालेले दिसून येते.म्हणून ख्रिस्ती व्यक्तीला भयाचा आत्मा दिलेला आहे,की तो देवाविरुद्ध पाप करू नये,पण आज काही ख्रिस्ती लोक आम्हाला आत्मिक स्वतंत्रता बहाल करण्यात आलेली आहे असे सांगून स्वतः पापाचा कचऱ्यात पडतात,पण देवाचे भयं धरत नाही.

देवाचा आत्मा नेहेमी या सात गुणांनी व्यक्त होतं असतो,खऱ्या ख्रिस्ती व्यक्तीत या सात गुणांचा प्रभाव दिसलाच पाहिजे,जर या सात गुणांचा अभाव एखाद्या ख्रिस्ती व्यक्तीत दिसत असेल तर तो फक्त फुग्यांमध्ये भरलेल्या हेलियम वायूसारखा आहे,जो उंचीवर जाऊन खाली पडतो,खरा ख्रिस्ती आत्मिक व्यक्ती पवित्र आत्म्याने भरलेला असतोच पण पवित्र शास्त्राचा ज्ञानाने पण तो पूर्ण असतो, पवित्र आत्म्याने भरणे आणि पवित्र शास्त्राने खाली असणे हा विरोधाभास खऱ्या ख्रिस्ती व्यक्तीत असूच शकत नाही.

**१३)धार्मिकता विश्वासाने प्रकट होते:-**

विश्वासाची वास्तविकता देवाच्या खऱ्या जीवनाला प्रकट करते.देवाचा मनुष्य ज्या वातावरणात जगतो,ते म्हणजे विश्वास .देव त्याचे वचन देईल व ते पूर्ण करील असा त्याचा पूर्ण विश्वास असतो.*जॉन मॅकआर्थर* म्हणतात "विश्वास हा ख्रिस्ती सत्याचा गाभा आहे;ते देवाच्या वचनाचे सार आहे.तो पवित्र जनांच्या एकदाच स्वाधीन केलेला आहे,आपण सर्वांनी ज्याकरिता लढावे असे विश्वास हे सर्वोच वास्तव आहे."

**१४)जे अर्धवट ख्रिस्ती आहेत त्यांच्या जग उपहास करिते:-**

"कशाला? मोठा प्रश्न आहे *विलियम मैकडोनाल्ड* एक उदाहरणं देऊन हे समजवतात ते म्हणतात _"एक राजा लढाई करण्यास जातो.शत्रूचे सैन्य मोठे व बलवान आहे .त्या राजाने प्रथम विचार केला पाहिजे की त्याचे सैन्य थोडे असून विजय मिळवू शकेल का? मग त्याला समजेल की लढाई करावी की तह करावा.ख्रिस्ती शिष्यत्वचेही असेच आहे.तेथे अर्धवट असे काही नाही.हे आत्मिक युद्ध लढण्यासाठी मला संपूर्ण शस्त्रे घालावी लागणार आहे मी अर्धवट शस्त्रे घालू शकतं नाही,अर्धवट पवित्र वचने मी माझा हृदयात साठवू शकत नाही,अर्धवट कोणाची सेवा मी करू शकत नाही,देवाचा राजयोद्धा नेहेमी पूर्ण तयारीनिशी तयार राहतो,अर्धवट आत्मिक तयारी आत्मिक आणि शारीरिक मृत्यूला कारणीभूत ठरते.म्हणून *केली* म्हणतो " _खारटपणा गमावलेला मीठ उपहासाचा विषय ठरते"ख्रिस्ताने सांगितले तुम्ही जगाचे मीठ आहात,पण मिठाचा खारटपणा गेला तर त्याला फेकण्या शिवाय काही उपाय राहत नाही.आपण आपला खारटपणा टिकवून ठेवलात का?आपण आत्मिक युद्धात संपूर्ण शस्त्रे घातलेली आहे का? नाही तर देवाचा सानिध्यात उभे राहा आणि ख्रिस्तात देवाची परिपूर्णता धारण करा अथवा पाश्चाताप करून आत्म्याला जागृत करा पुनर्स्थापित व्हा.

**१५) एक बंडखोर ख्रिस्ती म्हणून तुमचे अस्तित्व आहे का?:-**

"ज्याला देवाचा अनुग्रह झाला आहे.त्याला काहीही जड नाही.पण एलिस कूपर सांगतात की बियर पिणे सोपे आहे,त्या नशेत राहून दाणादाण करणे सोपे आहे,खरा ख्रिस्ती होणे सोपे नाही ती एक बंडखोरी आहे.खरा ख्रिस्ती व्यक्ती आपल्या कृत्यांच्या माध्यमातुन स्वतःच्या जीवनाची आणि ख्रिस्ती तत्वाशी तडजोड करू शकत नाही.ख्रिस्ती असणे ही जगाशी आणि सैतानाच्या तत्वाशी सर्वात मोठी बंडखोरी आहे.आणि म्हणून एक ख्रिस्ती व्यक्ती आत्मीक सैन्य म्हणून देवाच्या राज्याचे प्रतिनिधित्व करीत आहे.या जगात ख्रिस्ती व्यक्ती वेगळा केला गेलेला आहे याची जाणीव त्याला तेव्हाच होते जेव्हा तो आत्मिक युद्धात आपले दिलेले कार्य पूर्ण करत जातो .*

मोशेने फारोशी बंडखोरी केली का?कारण त्याला तात्पुरत्या आनंदापेक्षा अंनतकालिन आनंद आणि जीवन हवे होते.पण ती देखील देवाची आज्ञापाळून. *डॉ हेनरी थॉमस* लिहितात "मुसा वयाने मोठा झाला हेलीमोपोलिस म्हणजे सूर्याचे शहर येथील धर्म मंदिरात शिक्षणार्थ तो जाई. तो दाढीमिशा काढी. चेंडूचे खेळ खेळे विद्यार्थ्यांच्या मंडळात भाग घेई.तो लवकरच एक मात्तबर ईजिप्शियन सरदार झाला असता.मेल्यावर सुंदरशा शवपेटीत त्याच्या देह मसाल्यात घालून ठेवला असता.परंतु मुसा बंडखोर होता,तो ज्यू होता."मोशेला सुख,पद आणि सत्तेपेक्षा देव हवा होता.आपल्या ज्यु बंधूंना मुक्त करून त्यांना वचनदत्त भूमीत पोहचविणे हे त्याचे ध्येय आणि देवाने दिलेले प्रथम दर्शन होते.पण त्या

अगोदर मोशेला फारोशी बंड करायचे होते.कारण ही बंडखोरी केल्याशिवाय तो देवाची आज्ञा पूर्ण करू शकत नाही हे त्याला माहित होते.इतिहास साक्षी आहे मोशेने देवासाठी आणि आपल्या लोकांसाठी फारोशी आणि या जगाच्या अंधकाराचा शक्तीशी बंड केले.आणि तो देवाचा प्रिय आणि नम्र शिष्य झाला._*

जो पर्यन्त ख्रिस्ती व्यक्ती देवाच्या राज्यासाठी बंडखोरी करीत नाही;तो पर्यन्त तो या जगाशी समरुप आहे

**१६) प्रीती एका ख्रिस्ती व्यक्तीच्या जीवनात सर्वश्रेष्ठ असली पाहिजे:-**

प्रीतीचे दु:खसहन,रक्तसिंचन आणि मरण आपल्या जीवनात ख्रिस्ताने लागू केलेले आहे.पण आम्ही त्यापासून पळ काळणारी भित्री मुले आहोत कि निर्भय आकटेव्हियस विंस्लो म्हणतात "ख्रिस्ताची प्रीती,किती मोलाचा विषय,त्याविषयी आपण कधी कंटाळून जाऊ का?कधीच नाही,तीची महानता आपल्याला कधी आकलन होईल का?कधीच नाही,तिची संपन्नता आपण कधी साठवून ठेऊ शकू का?तिची खोली कधी माप शकणार नाही,की तिच्या परिमितीचे मोजमाप करू शकणार नाही,ती सर्व ज्ञानाच्या पलीकडची आहे,येशूने आपल्या लोकांसाठी जे सर्व केले ते हेच की त्याने आपली प्रीती उलगडून व्यक्त केली. बेथलेहेमच्या वाटेने फेरफटका मारतांना मला ती प्रीती देहधारी झालेली दिसते,सत्कर्म करीत जाणाऱ्या त्याच्या पावलांचा मागोवा घेताना मला प्रीतीचे परिश्रम करणारे पाय दिसतात,बेथानीच्या घराला भेट देतांना त्या प्रीतीची सहानुभूती दिसते,लाजराच्या कबरेपाशी उभे असता मला ती प्रीती रडताना दिसते,गेतशेमाणेच्या उदासवाण्या अंगणात प्रवेश करताना मला ती प्रीती शोक करतांना दिसते,कालवरीच्या वाटेने जातांना मला ती प्रीती दुखसहन रक्तसिंचन करतांना, मारतांना दिसते,त्याच्या संपूर्ण जीवनाचे दृश्य म्हणजे केवळ खोल,मूक करणारी आणि मुक्तीच्या प्रीतीचे मोलवान रहस्य उलघडणारी खोल प्रीती होय. माझे जीवनाचे चित्र काय उभे करते?ज्यावेळी मी क्रुसाचा वाटेवर उभा असतो तेव्हा माझ्यात ख्रिस्ताची खोल प्रीती प्रदर्शित होते का?सुवार्तासाठी मी फेरफटका मारतो का?यरुसलेम च्या शिवारपाशी आज असंख्य नाशामध्ये जाणारे लोक आहेत त्याच्यासाठी मी रडतो का?अशी असंख्य प्रश्न कालवरीच्या वाटेवर मला पडतात का?

**संदर्भग्रंथसूची-**

१) बायबल के प्रमुख सिद्धांत,विलियम इवंस,मसीहि साहित्य संस्था,२०११,दिल्ली
२) १०००० बायबल अध्ययन रूपरेखा,ए.एफ इ मार्श,जिस एस एल प्रकाशन,२०१५,हेद्राबाद
३) १०१ प्रेरणादायक कथा,जी फ्रान्सिस झेव्हियर,जयको प्रकाशन २०१४,मुंबई
४) दोष मुक्ती नया जन्म,चार्ल्स लैटर,एलीथिया प्रकाशन,२०१७,नासिक
५) जाब मार्ग उभड खाबड और खडी चढाई का हे,हेरी किल्ब्राइड,जी एस एल प्रकाशन,२०१६,हेद्राबाद
६) तुमच्या शत्रूला ओळखा,झेक पूनन,ख्रिस्ती फेल्लोशीप चर्च,२०११,चेन्नई,
७) ख्रिस्ती धर्म सिद्धांताचा परीचय,पामेला फिब्रोन,जीवनवचन प्रकाशन,१९९२,पुणे
८) खरी उपासना,जॉन मैकार्थेर,ग्रेस ऑफ इंडिया,२००४,पुणे
९) धेर्यवान असा,वॉरेन डब्लू विसर्बी,कूक प्रकाशन,२००४,पुणे
१०) पवित्र बायबल,लुककृत,शुभवर्तमान,अध्याय २१-वचन-२३